**इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ धुळें.**

**—: हस्त लिखित ग्रंथ संग्रह :—**

ग्रंथ क्रमांक ५१३७ (८६८)

ग्रंथ नाम बापू गोखले यांचें चरित्र.

विषय म० गद्य.

" Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

श्रीमंत कैलासवासी बापूजी गणेश ऊर्फ
बापूसाहेब गोखले यांची हकिगत.

१ धोंडोबल्लाळ व गणेशबल्लाळ गोखले हे उभ-
यतां बंधु, मौजे पिरदावण नजीक राजापूर
जिल्हा कोंकण, येथील तळेखाजणवाडी म्हणून
लहान गांव आहे, तेथें सुखवस्तु मिराशी से-
ताची वहिवाट करून वडिलांचे वेळेपासून,
राहात असत. धोंडोपंत यांची स्त्री आनंदी
बाई ही त्र्यंबकरावजी साहेब भावे संस्थान
नरगुंद यांची कन्या, तिला संतती झाली
नाहीं. गणेशपंत यांस पुत्र दोन, वडील
आपासाहेब व धाकटे बापूसाहेब. गणेशपं-
त हे कोठें रोजगारास न जातां गांवींच
राहात असत. धोंडोपंत साहेब हे सवाई
माधवराव साहेब पेशवे यांचे वेळेस ना-
ना फडणवीस यांचे चुलतबंधु गंगाधर
पंतभानू हे, विजयदुर्ग जिल्हा कोंकण ये-
थें सुभेदारीचे काम करीत असतां त्यां
चे हाताखालीं फडणिसीचे कामावर
सरकार हुकुमावरून होते. धोंडोपंतदादा
हे लिहिण्यांत हुशार असून जाबजबाबी
बोलणार व शूर असत; यामुळें त्यांजवर
नाना फडणीसांची मर्जी चांगली होती.
विजयदुर्ग सुभ्यांत दरसाल कोळवण लो-
क बंडावा करीत असत. त्यांणीं गांवें लुटा
वीं, रस्ते मारावे, ~~मार्ग चालू देऊं नये~~, असे अनेक प्रकार
चे त्रास रयतेस द्यावे; यांचें पारिपत्य-



"Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

नवीन शिबंदी लोक ठेऊन करण्याचा
हुजूरचा हुकूम पुण्याहून आला, म्हणजे-
सुभ्यांनीं बंडवाल्यांवर स्वारी करून त्यांस
पळवून लावावें, पुढें त्यांलोकांस नवीन
ठेवलेली शिबंदी कमी केल्याची खब
र लागतांच पुनरपि एकत्र होऊन
पूर्ववत् प्रजेस उपद्रव देऊं लागावें, या
प्रमाणें क्रम चालत असतां एक वर्षी
गंगाधर पंत भाऊ सुभे यांस सरकार
चें बोलावणें झाल्यावरून हिशेब वगैरे
देण्याकरितां ते पुण्यास आले. मागें पु
नरपि बंडाच्या जमाव होऊन गांव लुटूं ला
गले याचा बोभाट हुजूर सरकारांत आ
ला; त्यावरून सरकारचीं पत्रें धोंडोपंत
दादा यांचे नांवें गेलीं कीं, शिबंदी ला
गेल तशी ठेऊन बंडाचें पारिपत्य करून
पुन्हां वारंवार बंड न होईल असें करा
वें; त्याजवरून धोंडोपंत यांणीं शिबं-
दी जास्ती ठेऊन आपण जातीनें बंडाव-
र जाऊन त्यांशीं लढाई केली. त्यांत बंडवा
ल्यांचे बहुत लोक मारले गेले, इतकेंच ना
हीं, पण त्यांतील पुढारी लोक पकडून त्यां
चा शिरच्छेद केला. येणेंकरून बंड अग
दीं नाहींसें होऊन त्याप्रांतांत धोंडोपंत
दादांचीं दहशत पडून चोरटे लोक अग
दीं नाहींसे झाले. त्यायोगानें रयत सुखी

" Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

होऊन सरकारांत वसूल हीजास्ती येऊं
लागला. त्याजवरून सरकार संतुष्ट हो-
ऊन धोंडोपंतांस त्यांचे शूरत्वाविषयीं
नेकनामी पत्र लिहून पोषाख व बक्षीसें पा
ठविलीं व दरबारचे लोकांतही धोंडोपंतांचे
हुशारीचें व शूरत्वाचें वर्णन नेहमीं होऊं
लागलें. येणेंकरून गंगाधरपंत भानू
सुभे जे पुण्यास आले होते, त्यांस वैमन-
स्य वाढून फार वाईट वाटलें. पुढें कांहीं दि
वसांनीं भानूंस सरकारची परवानगी
होऊन विजयदुर्गास आपले कामा-
वर गेले; परंतु धोंडोपंत दादांची शि-
फारस सरकारांत होऊन आपली व
दनामी झाली हें चांगलें झालें नाहीं अ-
सें मनांत आणून धोंडोपंतांशीं अदा-
वत चालवून त्यांचा अपमान दरएक
कामांत करूं लागले; हें पाहून धोंडोप
त दादा हे पुण्यास गेले आणि सरका
रची व नाना फडणीस यांची भेट घेऊ-
न गंगाधरपंत भानू यांजवर अजमा
शें दहा लक्ष रुपये खाण्याचे तफावती
चीयाद दिली. मालक, बाल्या [illegible] स्थेंत
असल्यामुळें नाना फडणीस हे सर्व रा-
ज्याचे काम मुखत्यारीनें चालवीत हो
ते, त्यांणीं असा विचार केला कीं, गंगाध
र पंत भानू आपले चुलत बंधू यांजवर-

A Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

यादी पैकीं थोडीं जरी कलमें लागू झालीं तरी त्यांस लांछन लागून आपल्यास खालीं पहावें लागेल. याजकरितां धोंडोपंत दादांस परत न पाठवितां हुजूरांतच ठेवावें, हें बरें, असा विचार करून धोंडोपंतदादा यांस हुजूरच राहाण्या विषयीं हुकूम सांगितला, त्याजवरून धोंडोपंत दादा हे आपले पुतणे आपासाहेब व बापूसाहेब यांसह वर्तमान पुणें मुक्कामींच राहिले. आपासाहेब व बापूसाहेब हे उभयतां हुशार व शूर असत; त्यांचेही दरबारांत नित्य जाणें येणें असल्यामुळें त्यांची वागणूक व हुशारी पाहून सरकारची मर्जी त्यांजवर सुप्रसन्न होती. एके समयीं सरदाराचा हुद्दा देण्यास लायक आहेत असें कचेरींत खुद्द सरकार बोलले होते. नाना फडणीस यांची खासगत बसण्याचीं घोडीं अदमासें पन्नास होतीं, त्यांपैकीं दोन घोड्यांवर चाबूकस्वारसुद्धां बसण्याची परवानगी नव्हती. एखादे वेळेस मर्जीस आल्यास खुद्द नानांनीं मात्र बसावें; आणि बाकी सर्व खासगी घोडीं, स्वारी निघाली म्हणजे पुढें-कोतवाल चालवीत; अशी वहिवाट होती. एके दिवशीं धोंडोपंत हे घोड्यावर बसणार चांगले आहेत, असें, परभारें नानांस समजल्यावरून खासे घोड्यावर बसण्या विषयीं समक्ष धोंडोपंतदादांस सांगितलें होतें; नाना

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

1.05

ची स्वारी बहुत करून दररोज बेलबागेंत श्री
विष्णूचें दर्शनास जातअसे. एके दिवशीं
स्वारीची तयारी झाली ते वेळेस कोतवाल
घोडींही तयार होऊन उभीं होतीं, त्यांत स-
दरहू दोन घोड्यांपैकीं एक घोडी उभी होती,
तीजवर बसण्याकरितां जाऊन घोडीचे मो
तदारास धोंडोपंतदादा बोलले कीं काढणी
सोड मजला घोडीवर बसावयाचें आहे,
मोतदारानें ऐकून उत्तर केलें कीं, या घोडी
वर मालका शिवाय कोणीही बसावया
चें नाहीं; दुसरी घोडी कोतवाल आहे त्यां
जवर जाऊन बसावें हें बोलणें ऐकतांच मो
तदाराचे तोंडांत मारून घोडीवर बसून
उभे राहिले, तों नानांची स्वारी बाहेर आली.
त्यांजला तोंडांत मारल्याचा मजकूर मोतदा
रानें कळविल्यावर धोंडोपंतास उभे केले
त्यांजला नानानीं विचारलें कीं, माणसा
स कां मारिलें? हें ऐकून दादानीं उत्तर के
लें कीं, मोतदारानें फारच अमर्यादा केली;
तीअशी कीं, आपली परवानगी खासे घो
ड्यावर बसण्या विषयीं मजला झाली अ-
सतां, घोडीवर बसू देण्यास हरकत करूं-
लागला. सर्व राज्यांत आपला हुकूम मान्य
होतो, आणि मोतदार पांच रुपये किमदर-
माहाचे किमतीचा असोन, त्याणें अमान्य
केला, या बदल त्याजला जास्ति शिक्षाक-

राची



Joint Project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

(6)

रावी परंतु मी थोडिच केली, हें धोंडो पंत
दादाचें बोलणें ऐकून हांस्यवदन करून उत्तर
केलें कीं, आपण बहूत चांगलें केलें. पुढेंही
घोडी आपले कडेसच राहील. आपण ती
जवर बसत जावें नंतर ती घोडी त्यां क-
डेसच ठेविली. तिची चंदी, वैरण, रतीब,
खमोलदार सुध्धा सरकारांतून मिळत गेला.
धोंडोपंतदादा व यांचे पुतणे हुशार अ-
सोन शूरही चांगले आहेत, सबब त्यां
जला पालखी, नगारा, निशाण, [illegible]
देऊन सरदार करावे, असा विचार ना-
नानीं करून विजया दशमीचे दिवशीं
त्रिवर्गांसही वस्त्रें बहुमान करून पा-
लख्या व हत्तीही दिल्हे आणि शंभर शिले-
दार व शंभर पागेचे घोडे भरण्यास
परवानगी दिल्ही. त्यावरून यांणीं सर-
कार आज्ञे प्रमाणें पागा तयार केली;
व शिलेदार यांची ही भरती करून दोन
शे स्वारांची सरदारी झाली.

२ किंदूरकर देसाई यांणीं करनाट-
कांत फौजेचा जमाव करून सरकारी
अमलांत उपद्रव करूं लागले. यांचे पा-
रिपत्या करितां, राजेश्री गणेशपंत भेरे यांज
बराबर अजमासे चार हजार फौज देऊ-
न करनाटकांत रवाना केले. त्यांज बरा-
बर धोंडोपंतदादा व आपासाहेब व बा-
पूसाहेब

157

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

पूसाहेब यांत्रि वर्गासिही आपले पलकां
सह वर्तमान जाण्याचा हुकूम झाला.
ते समयीं त्यांणीं सरकारास विनंति के
ली कीं, आमची जमियत कमी आहे. सर
कारचे काम चांगले रीतीने झालें पाहिजे.
यावर जशी आज्ञा होईल तसें करूं. हें ऐ-
कून पांचशें स्वार पावतों आपली जमि
यत नेहमीं ठेवावी. व याशिवाय तुमचे
कुमकेस चिंतो त्रिंबक व माहादाजी त्रिं-
बक पुणेकर यांस सातशे स्वारांनि-
शीं तुमचे बरोबर येण्यास आज्ञा देण्यांत
येत आहे. असें सांगून रवानगी केली.
गणेशपंत भेरेकर नाशिकांत [illegible]
बापूसाहेब यांणी आपले लोक घेऊन त
ळ्याण्यास म्हणजे शत्रूचे फौजेची टेहळणी
करण्यास गेले. तिकडे पिंडारी हे स्वा
र व काटक लोकांचें पायदळ मिळोन सु
मारें पांच हजार फौज व पांच तोफा
सह, आपले तळावर तयार होते. त्यांणीं
टेहेळणीस आलेली फौज थोडी आहे अ-
सें पाहून त्यांजवर उठावणी केली; ते सम
यीं बापूसाहेब यांणीं मोठें शौर्य करू
न शत्रूचे लोक बहुत मारून तोफाही-
स्त करून घेतल्या; इतकेंच नाहीं पण त्यां
चे शेंपन्नास घोडींही धरून घेऊन आग-
दीं मोड करून टाकिला. तेणें करून किं-

183

दुरकरास

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

दूरकरास अशी भीति पडली कीं, एका लहा-
न टोळीनें आपली अशी अवस्था केली पु
ढें सर्व फौज आल्यावर आपला ठिकाण न
रहाला. आपले वडिलोपार्जित जे देसाई-
गिरीचे वतनासही धक्का बसेल, असें म-
नांत आणून जी नवीन ठाणीं घातलीं हो
तीं तीं उठऊन घेऊन गणेशपंत भेरे यांज
कडेस वकील पाठऊन सांगितलें कीं,
या पुढें आम्हांकडून जास्ति होणार ना-
हीं. नवीन फौज ठेवलेली बरतर्फ करि-
लों. या प्रमाणें बंदोबस्त बापूसाहेब यांचे
योगानें झाल्याचे व बंडावा मोडल्याची ख
बर भेरे याणीं सरकारांत लिहून परत
येण्याविषयीं आज्ञा मागितली, त्याजव-
रून भेरे यांस फौजेसुद्धां पुण्यास बो-
लावून, चांगली लढाई करून जलदी श-
त्रूचा मोड केला, याजबदल बापूसाहेब यां
स पोशाख व अलंकार बक्षिसें पाठविलीं,
आणि तुम्हीं चुलतेपुतणे त्रिवर्ग पुणेक-
राचे पलका सहवर्तमान करनाटकांत
राहून चांगला बंदोबस्त ठेवावा. अशी आ
ज्ञापत्रें पाठविलीं.

३ करनाटकांत सरकारी थोडी फौ-
ज राहून बाकी परत गेल्याची खबर मि
ळाल्यावरून किंदूरकर देसाई यानें पु-
न्हा नवीन शिबंदी ठेऊन सरकारी गां-



व

व कुटूं लागला. त्याजवरून हुजूरचे हुकुमावरून आणखी स्वार शिबंदी ला लागेल तशी जास्ति ठेऊन किंदूरकर यांचें पारिपत्य करून बंदोबस्त केला. आणि किंदूरकराजवळून, दरसाल रुपये खंडणी देत जाऊं असा दस्ताऐवज लिहून घेऊन सरकारांत पाठविला. त्याजवरून सरकारास संतोष झाला.

गोखले यांचे नवळ फौजेचा जमाव जदीद मिळोन सुमारें दोन आठीच ए शिबंदी जार पावेतों झाला होता. सरकारांतून खर्चास वेळचे वेळेस पावत नव्हतें आणि फौजेस तर दरमहाचे दरमाहा दिल्हे पाहिजे, सबब, नवलगुंदकर देसाई यांचा नवलगुंद तालुका अजमासे तीन लक्षाचा होता, तो दाबून घेतला. यांणी ही खर्च भागेना सबब, करवीरकर राजे यांजकडील, व पटवर्धन व मोंगलाईतील चांगले गांव पाहून, तेथें स्वारी करून गांवांपासून खंडणी घ्यावी अगर लुटून आणावे याप्रमाणें बहुत करून दरवर्षास करून तोफा, फायदळ, व स्वारांची जमियत अजमासे तीन चार हजार पावेतों हमेषा नवळ बाळगूं लागला. करनाटक प्रांतांत हमेषा बंड होत असे, परंतु गोखले यांणीं जाऊन त्याचे पारप



233

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

त्य करून बंदोबस्त ठेवावा, आणि सरका-
स झाले मजकुराची विनंती पत्रे पाठवित
असत. तेणेंकरून सरकार मर्जी त्याजव-
र वळून संतोष राही.

४ तुंगभद्रेचे तिरानजीक डुलगणी-
म्हणून मोठा गांव असोन सभोंवता गा-
वास चांगला गावकूस लढाऊ असे. त्यांत
किल्याखाररवी गढी मजबूत असोन तो-
फा वगैरे सामान गढींत असे. सेरव
सेदी कारक ही अजमासे पांचशे नेहमी
रहात. सरकारी मनुष्यास आपला गाव
केवढा आहे हें समजू नये म्हणोन कोणा-
सही गावांत येऊ देत नसत. [illegible]
जमाबंदी करितां मामलेदार आला म्हणजे
त्यांजला गावाचे हद्दी जवळीं सामोरे जा-
ऊन गावांनजीक आले म्हणजे मामले-
दाराचे डोळे बांधून गढींत नेऊन तेथें
डोळे मोकळे करून मर्जीस येईल तितका
वसूल देऊन पुन्हा पुर्ववत् प्रमाणें डोळे
बांधून गावांबाहेर गेल्यावर डोळे खुले-
करून मार्गस्थ करावे; या प्रमाणें ते ठोक
करीत असत. हें वर्तमान गोखले यांस स-
मजल्या वरून कांहीं शिवबंदी घेऊन त्या
गावावर गेले, तों काटक यांणीं गोळीचा
लवून लढाईस उभे राहिले. तेव्हां गोखले
यांणीं एकदम हल्ला करून गांव सर करून

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

जितके काटक लढत होते, यांजला धरू-
न यांचीं डोकीं उडवून आपले कडील का
रकून शिवबंदी ठेऊन गांवचा बंदोबस्त
केला. व याप्रमाणें जेथें जेथें, बंडाई हो
ती व कमाविसदार यांस लोक मानीत
नव्हते तिलक्यांचे पारिपत्य केल्यावरून
सर्व करनाटक प्रांतांत गोखले यांची ज
रब मोठी बसोन सरकारांत वसूल सुरळी
त जाऊं लागला. तेणेंकरून सरकारचि-
मर्जी गोखले यांजवर बहुत संतोष
होत गेली.

५ टिपूसुलतान यांचा तीर्थरूप है
दरअली याणें बंडावा करून श्रीरंगपट्टण
वगैरे करनाटकांत कांहीं राज्य संपाद
न केलें होतें, पुढें हैदरअली वारल्यावर
यांचे चिरंजीव टिपूसुलतान यांचे तीर्थ
रूपानीं संपादन केलेलें राज्य कायम
ठेऊन जास्ती मिळवावें या हेतूनें फौजे
च्याजमाव करून, निजाम व पेशवे यांचे
राज्यांस उपद्रव देऊन, किल्ले घेऊन ठा-
णीं बसवूं लागला. नरगुंदकर व्यंकट-
राव हे पेशवे सरकारचे आश्रित असोन,
करवीरकर यांचे अष्ट प्रधाना पैकीं,
सचीव यांची व टिपूची दहा महिने ल-
ढाई चालून अखेर टिपूनें नरगुंदचा-
किल्ला घेऊन नरगुंदकराचे दीवाण का-



Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

लोपंत यांस धरून, पिंजऱ्यांत घालून मा
रला. आणि व्यंकट रावजीस कैद केले
होते. टिपूसुलतान हा पेशवे, निजाम,
व इंग्रज, या त्रिवर्गांसही भारी जबरझा
ला. त्याचें पारिपत्य करावें म्हणोन इग्रजा
ची फौज येऊन नेहमीं लढाई चालत
होती, इतक्यांत, वर सांगितल्या प्रमाणें
पेशव्याचे आप्त नरगुंदकर याचें संस्था
न घेऊन त्यांस कैद केले, व मुलखांत
टिपू गणीं बसवूं लागला, यान्ने पारपत्य
करून नरगुंदकर यांस सोडविणे पेशव्यां
स अवश्य होतें. इतक्यांत इंग्रजांस ही
यांची फौज कुमकेस मागणें अवश्य पडे
ल, याजवरून पेशवे यांणीं आपले सर
दार परशरामपंत भाऊ पटवर्धन यांस
फौजे सह जाण्यास आज्ञा केली. गो-
खले यांजवर त्यांचे मदतीस जाण्यावि
षयीं पत्रें गेलीं, याजवरून ते दोन हजा
र स्वारानिशीं पटवर्धन यांस जाऊन
मिळाले. त्यांची फौज एकंदर सुमारें पंचवीस
हजार 25000 जमली. एकदोन दिवसांत टिपूशीं
मुकाबला करावयाचा; परंतु कृष्णा नदीस
पूर आला होता, तो उतरेपर्यंत नदी कि-
नारीं मुकाम करावा लागला. दुसरे दिव
शीं टिपूकडील सुमारें २०० स्वार बेद
म्हणजे पेंढारी, पेशव्यांची फौज फार

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

असतां, ही, नदीचे पुरामुळें बिन्न थोक
येऊन, पैलतिरास म्हणजे कष्णेचे दक्षि-
णेस उभे राहिले हें पाहून परशरामपंत
भाऊ बोलले कीं, एकवेळ आपले फौजे-
तून कोणी जाऊन त्या लोकांशीं मुकाब-
ला केल्यास फारच चांगलें होईल. हें धोंडो
पंत दादानीं ऐकून आपले डेऱ्याकडे ये-
ऊन आपले लोकांपैकीं, नदी पार होऊ-
न जाणारे असामी अजमासें तीनशें
निवडून तोंडांत तरवारी धरून कष्णे-
त उड्या टाकिल्या. टिपूचे स्वार निर-
भय पणे गाफिल होते, त्यांजवर एक
दम जाऊन हल्ला केला, आणि अजमा-
से पन्नास साठ असामी जखमी करून,
घोडीं घेतलीं. बाकि राहिलेले लोक प-
ळून गेले. धोंडोपंतदादांचे ह्या मर्दी
विषयीं सर्व फौजेस आश्चर्य वाटलें; नं
तर परशरामपंत भाऊ पटवर्धन यांणीं
नावा पाठवून दादांस त्यांचे लोकां सुध्दा
उतरून अलिकडेस आणिले. पटवर्धन
याणीं धोंडोपंत दादाचे शिपायगिरी
विषयीं शिफारस केल्यावरून पेशवे
सरकार, गोखले यांजवर बहूत प्रसंन्न
होऊन, बहुमान पुर्वक पत्रें पाठविलीं.
पुढें कांहीं दिवसांनीं टिपूचे फौजेचा
व इंग्रज व पेशवे यांचे फौजेशीं लढा-



333

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

ई होऊन तह झाला. त्यांत नरगुंदकर
यांजला सोडऊन घेऊन त्याचे संस्थान मो-
कळें करून त्यांचें त्यांस दिल्हें. नंतर कां-
हीं दिवसांनीं टिपूचें राज्य इंग्रज सरका-
रांनीं तारिख ४ मे सन्न १७९९ या सालां-
त घेतलें.

६ पेशवे व निजाम या उभयतां मध्यें
वैमनस्य येऊन, खर्ड्याची लढाई झाली;
त्यांत निजामाचा मोड झाला, ते वेळेस पु-
ढें उभय सरकारांनीं कसें चालावें या-
विषयीं नेम ठरून कांहीं मुलूख पेशवे
सरकारांनीं त्याज पासून घेतला. मशु-
रर मुलूख हा निजाम सरकारचा दिवाण
असोन याचे सल्लेने निजाम चालल्या
मुळें मालकाची खराबी झाली, यास्त-
व व पेशव्यांनीं दिवाण याजला आप-
ले स्वाधीन करून घेऊन पुण्यास बंगा-
त्याचे बागेंत इतमामाने ठेविले होते,
पुढें अजमासे दोन तीन वर्षांचे सुमा-
रास श्रीमंत माधवराव साहेब पेशवे-
कैलासवासी झाल्यावर मशरूर मुल-
ख आपले मालकाकडेस निघोन गेला.
इकडेस गोखले यांस मागील बंदोब-
स्तास्त करून जमीयत घेऊन हुजूर स्वा-
रीत यावें म्हणून पशव्याची पत्रें गेल्या
वरून, नरगुंद येथें कांहीं स्वार, व पा-
यदळ

Joint Project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

पदळ व तोफा ठेऊन, सडे दोनहजार -
लोक चांगले निवडक घेऊन, हुजूर स्वा-
रीत मिळण्याकरितां निघून घाले. इकडे
निजामाची फौज तीन हजार पायदळ,
दहा तोफा व दोन हजार पठाण असे मौ-
जे आंतर गंगी, प्रांत सुरपूर, येथील मु
कामास आली होती, ती बातमी गोरवले
यांस लागल्याबरोबर प्रातःकाळीं प्रहर -
दिवसाचे आंत साज वर एकाएकीं जाऊ
न तेथें दादा व बापूसाहेब यांणीं बहूत
शुरत्व करून पठाण लोक बहूत मारिले,
व कितीयेक पळून गेले, व जखमी होऊन
पडल्या पैकीं. विस पंचवीस असामी आं-
बंत होते, त्यांजला उचलून आपण त्यांची
बरदास्त करून जखमा बऱ्या केल्या. आ-
णि त्यांजला बहुमान वस्त्रें देऊन व बरो-
बर थोडीं माणसें देऊन हैदराबादेस र
वाना केले. त्यांणीं झालेला वृत्तांत निजा
मास कळविल्यावर, तें सरकार संतुष्ट हो
ऊन आपले तालुक्या पैकीं मौजे हाकु
र व मणूर व कुळनूर हे दहा हजाराचे व-
सुली गांव गोरवले यांस इनामीदारव-
ल जहागीर दिल्हे. या लढाईत थोंडे
पंतदादा यांस तोंडावर समोर तलवारीचा
Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "Joint project of the"

(16)

वार लागला. व बापू साहेब यांसही हाता-
चे मनगटावर तरवारीची जखम लागली,
ही खबर पेशव्यास लागून स्वारींतून
येण्या विषयीं गोखले यांस पत्र गेलें. त्या
जवरून ते परत नरगुंदास गेले-
७ पुणें मुकामीं श्रीमंत सवाई माधव
राव साहेब पेशवे कैलासवासी झा-
ल्यावर श्रीमंत बाजिराव साहेब यांचा
हुकूम चालू झाला. ते वेळेस राज्यां
त गलबल होती. काणी कोणास मानी
त नव्हते; ही संधी पाहून खरवर्षास गो-
खले आपल्यास उपद्रव देऊन गांव-
लुटितात, खंडण्या घेतात, सबब या
शीं लढाई करून पारिपत्य करावें असे
पटवर्धन यांणीं विचार करून एक लढा-
ई स्वारांची झाली त्यांत महादाजी विंच
क पुणेकर यांस जखमा लागोन ठार प-
डले. व आणखी ही लोक जखमी झाले.
त्या प्रमाणें पटवर्धनाकडील ही बहुतेक
लोक मेले गेले- नंतर उभयतांचा कर
वीरकर राजे यांणीं हा विचार केला कीं,
फौज पाठऊन गोखले यांचे पारिपत्य
करावें, असें मनांत आणून रत्नाकर
आपा दिवाण यांजबराबर करवीर
कर महाराजानीं अजमासे पांच ह
जार स्वार, कांहीं पायदळ, दहा पंधरा तो
फा, साहेब व नौबद वगैरे सामान
देऊन गोखले यांजवर पाठविले. ते

411

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

समक्षी यीं पुण्याकडेस बाजिराव साहे
ब नवीनच राज्याधिकारावर आले.
कारभारी कोणी मुकरर राज्य चालवि-
ण्यास झाला नव्हता. व नाना फडणीस
यांस ही सिंदे यांणीं धरून नगरचे कि
ल्यांत कैद करून ठेविले होते. वेळेस कु
मक मालका कडून येईल किंवा नाहीं,
असा अंदेशा मनांत आणून, सावनूर
शहर मोठें व सभोंवतीं ~~मोठें~~ मजबूत कोट
असून खंदकही मोठा बाहेरून आहे
असें पाहून गोखले फौजेसुध्धा तेथें
राहिले होते. इतक्यांत करवीरकराची
फौज येऊन तीन कोसांवर मुकाम
केला. आणि ~~खोद~~ गोखले यांजवर दररो
ज स्वांरी करावी यांणीही मुकाबला करावा प-
रंतु करवीर कराचे फौजेचा जोर ज्यास्त म्ह-
णजे गोखले यांणी मागें हटून किल्याचे
आश्रयास येऊन शहरचे तटावरून तोफा
माराव्यात म्हणजे राजाची फौज परत मु
कामास जाई या प्रमाणें दर रोज साहा म
हिनें लढाई थोडी थोडी होत गेली. कुमक
पाठवावी म्हणोन सरकारांत पत्रें पाठवी
त गेले परंतु पुण्याहून मदत ते वेळेस
झाली नाहीं पुण्याहून कुमक गोखले
यांस येत नाहीं ही रत्नाकर आपांची
खात्री होऊन त्याचे फौजेचे लोकही सहा
महिनें गोखले यांस एके गांवांत कोंडून

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

ठेविल्याचे वैभवांत निमग्न होऊन बेफिकी-
र राहूं लागले, इतकेंच नाहीं, पण रत्नाकर
आपा पाही जातीनें आपले फौजे बराबर ल
ढाईस यइतनासे झाले- रत्नाकर आपानी
बाहेरून रसद येण्याची बंदी केली- तेव्हां
शहरांतील लोकांस व गोरखले यांचे फौजे
स खाण्याची पंचाईत पडून गोरखले या
णीं विचार केला कीं, मालका कडून कुमक
येतनाहीं व येथें ही धान्य बाहेरून येण्याची
बंदी झाली, यामुळें विपत्ति भोगावी लाग
ते, त्यापेक्षां सर्व आपली फौज, पायदळ, तो
फा सुध्धां तयारकरून करवीर करांचे फौ
जेवर तुटून पडावें, त्यांत इश्वरास यश
देणें असेल तर देईल, नाहीं तर लढाईंत
मरून जाऊं- असा विचार करून एके दि-
वशीं सर्व फौजेची तयारी करून शहरा
बाहेर निघून तोफा व पायदळ गुप्तप-
णे ~~बयेक~~ ~~कयांत~~ नाल्यांत उभें करून स्वारांच्या-
तीन तुकड्या केल्या- धोंडोपंत दादा व आ-
पा साहिब व बापूसाहिब असे श्रीवर्ग सरदार
तीन तुकड्यांत उभे राहिले; इतक्यांत दर
रोजचे बेता प्रमाणें राजाकडील फौजे पै-
कीं, स्वार अजमासें दोन हजाराची तुक
डी त ~~कम्यास~~ काण्यास आली. रत्नाकर आपा मु
कामावरच राहिले होते. आलेले स्वारां

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

452

नीं गोरखले यांचे स्वाराच्या तुकडया पाहून,
बापूसाहेब ज्या फौजेच्या तुकडींत होते, त्या-
जवर चालकरून अंगावर जाऊन पडले.
इतक्यांत नाल्यांत पायदळ व तोफा होत्या,
त्या एकाएकीं नाल्या बाहेर येऊन राजांचे
फौजेवर तोफा सुरू केल्या. तेणें करून ब
हूत लोक मारले गेले, व जखमी झाले आ
णि राहिलेले स्वार तळावर जाण्यां कीरतां,
पळून गेले. त्यांचे मागें आपासाहेब व बा-
पूसाहेब फौजेसुध्धा लागोन, मागून दाजी
साहेब याणीं तोफा पायदळ यांचा गोळ बां
धून चालले; तिकडेस रत्नाकर आपा व
त्यांची फौज नित्या प्रमाणें गाफील होते
इतक्यांत पळ काढिलेले स्वार तेथें दाख->
ल होतांच बापूसाहेब व आपासाहेब फौ-
जे सुध्धा जाऊन एकदम हल्ला केला. हा अ-
कस्मात प्रसंग प्राप्त झालेला पाहून, र
त्नाकर आपासुध्धा सर्व फौज घाबरून
प्राण रक्षणा विषयीं पळूं लागले इतक्यां
त मागाहून धोंडोपंतदादाही पायदळ,
तोफा, घेऊन दाखल होऊन तोफा चा
लू केल्या. तेव्हां राजांचे फौजेचा अग-
दींच धीर सुटून सर्व सामान तोफा, ह
त्ती, डेरे, सोहब, व नौबद सुध्धा जाग्या-
वर सोडून आपला जीव घेऊन जाला-
जिकडेस वाट सांपडली तिकडे पळून

Joint Project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

## मूळ प्रत पाहण्यासाठी संपर्क

---


**इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे**
राजवाडे पथ, गल्ली नं. १, धुळे-४२४००१ (महाराष्ट्र)
**दूरध्वनी क्रमांक** (०२५६२) २३३८४८
**Email ID** : rajwademandaldhule@gmail.com